*विजय महायुतीचाच*

*अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी कुटूंबियांसह बजावला मतदानाचा हक्क*

राज्याचे अर्थमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज चंद्रपूरातील सिटी हायस्कुल येथील मतदान केंद्रावर पत्नी सौ. सपना, मुलगी डॉ. शलाका यांच्यासह मतदान केले. महाराष्ट्रात विकासाचा, गोरगरीब जनतेचा विजय होईल अर्थात महायुतीचा विजय होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विविध वाहिन्यांवरील सर्व्हेक्षणामध्ये सुध्दा महायुतीचे सरकार सत्तारूढ होईल असा अंदाज वर्तविला जात आहे. चांदा ते बांदा असे महाराष्ट्राचे वर्णन केले जाते. चांदयात आणि बांदयासह संपूर्ण महाराष्ट्रात महायुतीचाच विजय होणार असेही ते यावेळी बोलताना म्हणाले.